आर.सी.सी क्र.१४१२/२०१८
सरकार विरुध्द. रमेश
निशाणी क्र.५६/क

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक १ यांची जबानी –**

मी प्रतिज्ञापुर्वक शपथेवर निवेदन करतो की,

**माझे नाव – श्री. मोहम्मद इलियास मोहम्मद सईद शेख**

वय – ६१ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त,

राहणार – सुधाकर नगर, बीडबायपास, औरंगाबाद.

---

**सरतपासणी अभियोग पक्षा करीता श्री. बी.पी. काकडे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे द्वाराः–**

१. सन २०१८ मध्ये मी राज्य राखीव पोलीस दल, बल गट क्र.१४, आय.आर.बी. –१, औरंगाबाद येथे सहाय्यक समादेशक म्हणुन कार्यरत होतो. आमच्याकडे पोलीस शिपाई यांची भरती होती. सदर भरतीचे प्रमुख समादेशक हे श्री. सुरेश माटे हे होते. ईतर दोन सदस्य श्री. चव्हाण व देशमुख हे होते, मी त्या भरतीसाठी अल्पसंख्यांक अधिकारी व सहाय्यक समादेशक म्हणुन कार्यरत होतो. नेहमीप्रमाणे भरती चालु होती. दिनांक १७.०३.२०१८ रोजी आम्ही सकाळी ०५.३० वाजता उमेदवार बोलवले होते. सदर उमेदवारांचे कागद पडताळणी करुन शारिरीक मोजमाप घेतले होते. जे उमेदवार शारिरीक मोजमापामध्ये नियमानुसार योग्य होते त्यांची १०० मिटर धावणे व गोळा फेकची परिक्षा घेतली. त्यानंतर ५ कि.मी. पळण्याची परिक्षा घेतली. या पळण्याच्या परिक्षेचा सुरुवातीचा बिंदु आमचे केंद्रामध्ये होते, तर अडीच कि.मी. चा बिंदु हा तांडा रस्त्यावर होता व परत आमच्या केंद्रातील बिंदु पर्यंत यायचे होते. त्याप्रमाणे भरती चालु झाली.

२. दिनांक २९.०३.२०१८ रोजी एक आम्हाला निनावी पत्र मिळाले. सदर पत्रामध्ये नमुद केले होते की, ५ कि.मी. च्या पळण्याच्या परिक्षेमध्ये उमेदवारांनी घोळ केलेला आहे व त्यांना टोकन घेवुन मोहम्मद इलियास मोहम्मद सईद शेख याने पैसे घेवुन घोळ केलेला आहे. त्यानंतर आम्ही आमच्या कमिटीची बैठक घेतली. त्यामध्ये आम्ही सी.सी.टी.व्ही. फुटेज तपासले. त्यामध्ये चेस्ट क्र.२८६३ श्री. रमेश दांडगे, व चेस्ट

क्र.२८६५ श्री. अमोल वाणी हे दोन जण पळण्याच्या परिक्षेमध्ये होते. श्री. रमेश दांडगे याने अडीच कि.मी. चा टप्पा पुर्ण केला व टोकन घेतले व त्यानंतर पुन्हा पळणे सुरु केले व मध्ये येवुन क्र.२८६५ अमोल वाणी याला ते टोकन दिले. त्यानंतर पुन्हा फिरुन त्याने अडीच कि.मी. च्या केंद्र बिंदुकडे जावुन नविन टोकन घेतले व पाच कि.मी. चा टप्पा पुर्ण केला. त्यानंतर सदर दोघांना कमिटी समोर बोलविण्यात आले व त्यांना विचारणा करण्यात आली व दोघांनी कबुल केले की, रमेश दांडगे याने रमेश वाणी मध्येच टोकन दिले व पुन्हा रमेश दांडगे याने जावुन दुसरे टोकन मिळवले. त्याप्रमाणे पळण्याच्या स्पर्धेत रमेश दांडगे व अमोल वाणी यांनी घोळ केला म्हणुन पोलीसांना आवाज दिला. प्रत्यक्षात दोन्ही उमेदवारांनी पुर्ण पाच कि.मी. चा टप्पा करणे अनिवार्य होते परंतु तसे केले नाही म्हणुन पोलीसांकडे तक्रार दाखल केली. पोलीसांना आम्ही तक्रार देतांना सी.सी.टी.व्ही. फुटेज दिले. तसेच पांढ–या काळया रंगातील चेस्ट क्रमांकाचे कापड ज्यावर २८६३ व २८६५ क्रमांक लिहिलेला पोलीसांना दिला. तसेच पोलीसांना दोन गुलाबी रंगाची टोकन दिले त्यावर एका बाजुला राजमुद्रेचे सिल व दुस–या बाजुला समादेशक राज्य राखीव पोलीस दल, बल गट क्र.१४, आय.आर.बी.–१, औरंगाबाद असे नमुद केलेले आहे. मला आता मी दिलेली फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर फिर्यादला **<u>नि.क्र.५७</u>** देण्यात येत आहे. तसेच छापील फिर्यादवर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर छापील स्वरुपातील फिर्यादला **<u>नि.क्र.५८</u>** देण्यात येत आहे.

३. दिनांक १२.०६.२०१८ रोजी पोलीसांनी माझ्याकडुन भारतीय पुरावा कायदयाअतंर्गत डी.व्ही.डी. करिता प्रमाणपत्र घेतले. ते पत्र मला आता दाखवले, ते हेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर पत्रास **<u>नि.क्र.५९</u>** देण्यात येत आहे. पोलीसांनी चेस्ट क्रमांक, टोकन व डी.व्ही.डी. जप्त केले. त्याचा पंचनामा केला. त्या पंचनाम्यावर माझी सही घेतली. पंचनाम्यावरील सही मला दाखवली. सहीला **<u>नि.क्र.६०</u>** देण्यात येत आहे. मी दोन्ही आरोपींना ओळखतो, दोन्ही आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहेत. मला मुद्देमाल दाखविल्यास मी ओळखु शकतो. मला आता मुद्देमाल चेस्ट क्रमांक चे कापड २८६३ व २८६५ दाखवले. ते हेच आहेत. त्यांना अनुक्रमे **<u>आर्टीकल अ व ब</u>** देण्यात येत आहे. हे चेस्टचे कापड असे तयार केलेले आहे की, एक भाग छातीवर व एक भाग पाठीवर येतो. मला मुद्देमाल गुलाबी रंगाचे

टोकन दाखवले, ते हेच टोकन आहेत, ते टोकन हे स्पर्धा परिक्षेच्या वेळी आरोपींना देण्यात आले होते. दोन्ही टोकन हे सारखेच आहेत. सदर टोकनला **आर्टीकल क व ड** देण्यात येत आहे.

***(सरतपास डी.व्ही.डी. सिलबंद पाकीटातुन काढुन दाखवणे व त्यासाठी होणारा पुढील सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात येत आहे.)***

| समक्ष | श्रवणोत्तर स्वीकृती. |
| --- | --- |
| RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR Digitally signed by RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR Date: 2026.04.04 17:37:14 +0530 | RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR Digitally signed by RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR Date: 2026.04.04 17:37:19 +0530 |
| ( श्री. आर. एस. जांबोटकर ) | ( श्री. आर. एस. जांबोटकर ) |
| मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद | मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद |

दिनांक– ०४/०४/२०२६.